


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ३१६, मंगळवार ९ डिसेंबर २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# तिखोल फाट्यावर 'रास्ता रोको'

**नरभक्षक बिबट्याला ठार मारण्याची परवानगी द्या | संतप्त ग्रामस्थांची मागणी | वनविभाग अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे | पठार भागातील वाढत्या हल्ल्यांवर तातडीच्या उपाययोजनांची घोषणा | बिबट्याच्या दहशतीने संतप्त ग्रामस्थ रस्त्यावर**

तिखोल फाटा : प्रतिनिधी

**तालुक्यातील पठार भागातील सततच्या बिबट्या हल्ल्यांमुळे निर्माण झालेल्या भीषण दहशतीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी सकाळी ११ वाजता तिखोल फाट्यावर नगरकल्याण महामार्गावर ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन छेडले. शेकडो शेतकरी, महिला आणि युवक सहभागी झालेल्या या आंदोलनामुळे महामार्ग तब्बल ४५ मिनिटे ठप्प राहिला.**

ग्रामस्थांनी ''बिबट्यामुक्त गावे करा'', ''नरभक्षक बिबट्याला ठार मारण्याची परवानगी द्या'' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. विशेषतः किन्ही येथील ७० वर्षीय भागुबाई विश्वनाथ खोडदे यांचा शेतात काम करताना झालेल्या बिबट्या हल्ल्यात मृत्यू झाल्यामुळे संताप अधिक वाढला आहे.



### पठार भागात भीतीचे वातावरण

२ डिसेंबर रोजी घडलेल्या भागुबाई खोडदे यांच्या मृत्यूनंतर किन्ही, करंदी, तिखोल, बहिरोबावाडी, गोरेगाव, हिवरे कोरडा, काकणेवाडी या गावांत भीतीचे सावट पसरले आहे. संध्याकाळीनंतर कोणीही घराबाहेर न पडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पठार भागातील शेतकरी नेते अनिल देठे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. महिलांचा मोठा सहभाग आणि सर्वपक्षीय नेत्यांचा एकजुटीने मिळालेला पाठिंबा आंदोलनाची ताकद अधोरेखित करणारा ठरला.

### वनविभागाविरोधात संतापाचा उद्रेक

आंदोलनकर्त्यांनी वनविभागाच्या 'निष्क्रियते'वर टीका करत तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन चर्चा केल्यावर – पिंजरे लावणे, विशेष ट्रँक्विलायझर पथक बोलावणे आणि नुकसानभरपाईबाबत तातडीचा अहवाल देणे – याची हमी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

### नेत्यांचा आक्रमक सूर

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत म्हणाले, ''पठार भागात बिबट्यांचा त्रास नियंत्रणात नाही. आता सामान्य माणसाला रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहिला नाही. न्यायासाठी जेलमध्ये जावे लागले तरी मागे हटणार नाही.''राष्ट्रवादी नेते दीपक लंके यांनी, ''परिसरात कायमस्वरूपी रेस्क्यू टीम हवी. खोडदे कुटुंबीयांना तातडीने मदत द्यावी,'' अशी मागणी केली. शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांनी, ''शेतकऱ्यांना शस्त्र परवाने देण्याची वेळ आली आहे,'' असे विधान करत ते शासनाला भिडले.जाणता राजा प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण ठुबे म्हणाले,''सरकारला माणसे हवेत की बिबटे? घटनांची मालिका पाहता वनविभाग जबाबदार आहे.''

### वीस पिंजरे बसवा

पठार भागात बिबट्यांची संख्या झपाट्याने वाढली असून हल्लेही वाढले आहेत. किन्ही, करंडी, तिखोल, गोरेगाव हा डोंगराळ परिसर असल्याने बिबट्यांचा अधिवास मोठा आहे. त्यामुळे किमान २० पिंजरे बसवून बिबटे पकडून सुरक्षित ठिकाणी सोडावेत, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

अनिल देठे, शेतकरी नेते

### ''दशक्रिया विधी वनविभाग कार्यालयातच करू''

भागुबाई खोडदे यांचे कुटुंबीय अद्याप आर्थिक मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की''नुकसानभरपाई न मिळाल्यास आणि नरभक्षक बिबट्याला न पकडल्यास दशक्रिया विधी पारनेर येथील वनविभाग कार्यालयातच करू.''

### '' विशेष रेस्क्यू पथक नेमणार''

''बिबट्यांचे वाढते हल्ले लक्षात घेता पठार भागात २० पिंजरे बसवण्यात येणार आहेत. तसेच राज्य व केंद्र शासनाकडे बिबट्या नसबंदीचा प्रस्ताव पाठवणार आहोत. पारनेर तालुक्यासाठी विशेष रेस्क्यू पथक तातडीने नेमले जाणार आहे.''

धर्मवीर सालविठ्ठल,
जिल्हा उपवन संरक्षक, अहिल्यानगर

# मारूती रेपाळेंची 'साखर पेरणी' सुरू !

**जिल्हा परिषदेत रंगणार जंगी लढत**

जवळा: प्रतिनिधी

पारनेर तालुक्यातील कान्हुरपठारजवळा जिल्हा परिषद गटात आगामी निवडणुकांची चाहूल लागली असून दोन्ही प्रमुख पक्षांनी मोर्चेबांधणी वेगात सुरू केली आहे. खासदार नीलेश लंके यांचे विश्वासू सहकारी आणि पारनेर बाजार समितीचे माजी संचालक, पुणेवाडीचे माजी सरपंच मारूतीशेठ रेपाळे यांनी गावोगावी साखर वाटप करून आपली 'साखर पेरणी' सुरू केली आहे. यामुळे गटातील राजकीय तापमान चांगलेच चढले आहे.





### साखर पेरणीच्या सुरूवातीने निवडणुकीची तुतारी

कान्हुरपठार, जवळा परिसरात रेपाळे यांची मोठी नातेवाईकांची फळी असल्यामुळे त्यांचे साखर वाटप हे फक्त औपचारिकतेपुरते न मानता, जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचाराला मिळालेली अधिकृत सुरूवात असे राजकीय वर्तुळात स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. मारूती रेपाळे हे गेली तीन दशके सक्रीय राजकारणात असून जेष्ठ नेते, माजी आमदार नंदकुमार झावरे यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना खासदार नीलेश लंके यांचा ठाम पाठिंबा असल्याचेही बोलले जात आहे.

### लंकेरे –पाळे युतीचा प्रभाव की भाजपची ताकद?

कान्हुरपठार, वडझिरे, जवळा, करंदी आणि आसपासच्या गावांमध्ये रेपाळे यांचे नातेवाईक आणि समर्थक मोठ्या संख्येने आहेत. त्यावर खासदार नीलेश लंके यांच्या प्रभावाची जोड मिळाल्याने राष्ट्रवादी (शरद पवार गट) येथे मजबुतीने उभी आहे. दुसरीकडे भाजपची संघटनात्मक ताकद आणि विश्वनाथ कोरडे यांचा वैयक्तिक संपर्ककार्य यामुळे सामना तगडा होणार हे निश्चित.

### भाजपकडून विश्वनाथ कोरडे रिंगणात

या जिल्हा परिषद गटात भाजपकडून विश्वनाथ कोरडे यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. कोरडे हे विकासकामे आणि स्थानिक प्रश्नांवर गेल्या काही दिवसांपासून जनसंपर्काचा धडाका लावत आहेत. गटातील विविध गावांमधील समस्या व पायाभूत सुविधांबाबत ते थेट नागरिकांशी संवाद साधत आहेत.

### गटातील लढतीकडे तालुक्याचे लक्ष

दोन्ही बाजूंनी मोर्चेबांधणी वेगात सुरू असल्याने कान्हुरपठारजवळा जिल्हा परिषद गटातील निवडणूक अत्यंत रोचक होणार आहे. रेपाळे यांची साखर पेरणी आणि कोरडे यांचा जनसंपर्क यामुळे गटात वातावरण तापू लागले आहे. येत्या काही दिवसांत उमेदवारी जाहीर होताच निवडणूक रंगत आणखी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

# महापालिका निवडणुकीत 'ठाकरे ब्रँड' चा फुगा फुटेल !

**मुख्यमंत्री फडणवीसांची ठाकरेबंधूंवर नाव न घेता झोड**

मुंबई : प्रतिनिधी



**नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांच्या धुरळ्यात विरोधकांचा 'कार्यकर्ता प्रेम' किती उथळ आहे, हे पुन्हा स्पष्ट झाले असून, आपल्या कार्यकर्त्यांना पूर्णपणे वाऱ्यावर सोडणाऱ्या विरोधी पक्षांच्या नेतृत्त्वावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घणाघाती प्रहार केला. ''कार्यकर्ते लढत होते, पण त्यांच्यासाठी मैदानात उतरायला त्यांच्यात हिम्मत नव्हती. कारण हरले तर महापालिका निवडणुकीत दाखवायचा 'ठाकरे ब्रँड' फुटेल, ही भीती त्यांना सतावत होती,'' अशा शब्दांत फडणवीस यांनी उद्धव आणि राज ठाकरे यांच्यावर नाव न घेता तिरकस निशाणा साधला.**

फडणवीस म्हणाले की, नगरपालिका निवडणुका या कार्यकर्त्यांच्या खांद्यावर उभ्या असतात. ''आम्ही तिघांनीमी, उपमुख्यमंत्री शिंदे आणि अजित पवारकार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा शब्द दिला होता. जिथे शक्य होते तिथे युती केली, काही ठिकाणी वेगळे लढलो. मी मुख्यमंत्री असूनही दहा हजार लोकसंख्या

उर्वरीत पान ३ वर

# कुकडी डावा कालवा आवर्तन सोडा

**आमदार काशिनाथ दाते यांचा पाठपुरावा**

पारनेर : प्रतिनिधी

**कुकडी डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकरी सध्या हिवाळी हंगामातील कांदा लागवडीमध्ये व्यस्त आहेत. या पिकासाठी आवश्यक ती सिंचनाची उपलब्धता वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या काही दिवसांपासून शेतकरी वर्गाकडून कालवा आवर्तन तातडीने सुरू करण्याची मागणी होत असताना, या प्रश्नाची गंभीर दखल घेत आमदार काशिनाथ दाते यांनी जलसंपदा मंत्री तसेच अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला.**



या मागणीचे गांभीर्य ओळखून मंत्री विखे पाटील यांनी कुकडी सिंचन मंडळाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती अलका अहिरराव यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून स्थितीची माहिती घेतली. आमदार दाते यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेनंतर त्यांनी आवर्तनाबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

अधीक्षक अभियंता अहिरराव यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांनी १५ डिसेंबर रोजी आवर्तन सुरू करण्याची मागणी केली होती. परंतु सध्या कालव्याच्या दुरुस्तीची कामे सुरु असल्याने आवर्तन विलंबित होत आहे. ही कामे २० डिसेंबरपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा असून, २० ते २५ डिसेंबर दरम्यान आवर्तन सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

उर्वरीत पान ३ वर

# धनंजय मुंडेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**अजित पवार अन् राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्लाही हजर | तर्कवितर्कांना उधाण**

नागपूर : प्रतिनिधी



**सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीवेळी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार व राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्लाही हजर होत्या. यावेळी त्यांच्यात कोणती चर्चा झाली? त्याचा तपशील मिळाला नाही. पण ही भेट मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या अवतीभोवती फिरणारी होती, असा दावा सूत्रांनी केला आहे.**


नागपुरात आजपासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या दिवगंत माजी सदस्यांना श्रद्धांजली

उर्वरीत पान ३ वर

# राष्ट्रवादी नेत्या गीताताई हिंगे यांचे अपघातात निधन

**पाचगावजवळ भीषण धडक | गडचिरोली राजकारणात शोककळा**

गडचिरोली : प्रतिनिधी



**गडचिरोली जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा गीताताई हिंगे यांचे पाचगाव येथे झालेल्या भीषण अपघातात निधन झाले. रविवारी उशिरा रात्री घडलेल्या या दुर्घटनेने संपूर्ण जिल्हा शोकमग्न झाला आहे. त्यांच्या अचानक झालेल्या निधनाने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे.**

गीताताई हिंगे या रविवारी खासगी कामासाठी नागपूरला गेल्या होत्या. कामकाज आटोपून रात्री उशिरा गडचिरोलीकडे परत येत असताना पाचगाव परिसरात विरुद्ध दिशेने भरधाव येणाऱ्या कारने त्यांच्या कारला जोरदार ठोकर दिली. धडक इतकी भीषण होती की गीता हिंगे यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पतींना किरकोळ दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार

उर्वरीत पान ३ वर

# शुभमन गिलचे पुनरागमन

**टीम इंडियाला मोठा दिलासा | मंगळवार पासून टी-२० मालिका**

मुंबई : प्रतिनिधी

**भारतदक्षिण आफ्रिका एकदिवसीय मालिकेत २-१ अशी दमदार बाजी मारल्यानंतर आता दोन्ही संघांमध्ये टी-२० मालिकेची रंगत चढणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेतील पहिला सामना मंगळवार, ९ डिसेंबर रोजी कटकच्या बाराबती स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. त्याआधीच टीम इंडियासाठी सर्वात आनंदाची बातमी समोर आली आहे उपकर्णधार शुभमन गिल संघात पुनरागमन करत भुवनेश्वरला दाखल झाला आहे.**



कसोटी मालिकेदरम्यान झालेल्या दुखापतीमुळे शुभमन गिल प्रथम कसोटी आणि नंतर एकदिवसीय मालिकेतून बाहेर गेला होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कोलकाता कसोटीत त्याला झालेल्या दुखापतीमुळे त्याला मालिकेला मुकावे लागले. टी-२० मालिकेसाठी त्याची निवड तर झाली होती, परंतु त्याचा सहभाग त्याच्या फिटनेस चाचणीवर अवलंबून होता. शेवटी बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे घेतलेल्या फिटनेस चाचणीत गिल यशस्वी ठरला आणि सर्व निकष पूर्ण करत त्याने मैदानात पुनरागमनाची तयारी पूर्ण केली.

मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनीही शेवटच्या एकदिवसीय सामन्यानंतर गिल पूर्णपणे तंदुरुस्त असल्याची स्पष्ट माहिती दिली. ''शुभमन केवळ फिट नाही, तर धावा करण्यासाठी उत्सुक आहे,'' असे गंभीर यांनी सांगितले. गिल रविवारी रात्री नेमके ९ वाजता भुवनेश्वर विमानतळावर पोहोचला आणि तत्काळ टीम हॉटेलमध्ये दाखल झाला.

उर्वरीत पान ३ वर

# थंडीची पुन्हा चाहूल

**राज्यभरात तापमानघटीचा प्रभाव**

मुंबई : प्रतिनिधी

**नोव्हेंबरमध्ये अचानक गारठ्याची अनुभूती दिल्यानंतर मुंबईत पुन्हा एकदा थंडीची चाहूल लागण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात शहरातील किमान तापमान १७ अंशांपर्यंत खाली उतरण्याचा अंदाज असून गुरुवारीशुक्रवारी ते १६ अंशांपर्यंत घसरण्याची शक्यता आहे.**



पश्चिम भारतात पुढील दोन ते तीन दिवसात तापमानात साधारण दोन ते तीन अंशांची घट होईल, तर विदर्भात सोमवारी आणि मंगळवारी थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भातील काही भागांत रविवारीच किमान तापमान १० अंशांखाली नोंदले गेले. मुंबईत रविवारी सांताक्रूझ येथे किमान तापमान २०.३, तर कुलाबा येथे २२.६ अंश नोंदले गेले. सरासरीपेक्षा जास्त असलेले हे तापमान सोमवारपासून घटत जाऊन बुधवारी १७ अंशांपर्यंत खाली येण्याचा अंदाज आहे.

किमान तापमानात घट होत असताना कमाल तापमान मात्र चढेच राहणार आहे. पुढील आठवड्याच्या अखेरीस कमाल तापमान ३४ अंशांपर्यंत जाऊ शकते. रविवारी सांताक्रूझ येथे ३३.९ आणि कुलाबा येथे ३२.८ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. राज्यातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंदही सांताक्रूझ केंद्रात झाली.

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही गारठा जाणवत असला तरी किमान तापमान सर्वसाधारण पातळीवरच आहे. पुणे, लोहगाव, नाशिक, सातारा, सोलापूर येथे रविवारी सरासरीपेक्षा अंशभर जास्त तापमान नोंदले गेले.

उर्वरीत पान ३ वर

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# काय आहे 'स्मार्ट'पिन?

**स्मार्टफोननंतर काय हा प्रश्न सर्वसामान्य वापरकर्त्यांना पडत आहे, त्याच्या कितीतरी आधीपासून तंत्रज्ञान क्षेत्र त्यावर उत्तर शोधत आहे. भ्रमणध्वनीपासून ते स्मार्टफोनपर्यंत झालेल्या संपर्क- संवादाच्या तंत्रज्ञान क्रांतीनंतर 'वेअरेबल' उपकरणांनी हे उत्तर बनण्याचा प्रयत्न केला खरा; पण त्यांच्या मर्यादा अल्पकाळातच स्पष्ट झाल्या आहेत. अशा वेळी स्मार्टफोनच्या क्षमतेच्या जवळपास जाऊ शकेल, असे एक उपकरण गेल्या आठवड्यात जगासमोर सादर झाले. 'एआय पिन' असे त्याचे नाव. आर्टिफिशियल इंटिलिजन्सच्या साह्याने स्मार्टफोनची अनेक कामे करू शकणारे हे उपकरण कसे आहे जाणून घेऊया...**




## काय आहे एआय पिन...

एआय पिन हे साधारणपणे हाताच्या तीन बोटांच्या दोन पेरांइतक्या आकाराचे चौकोनी डिव्हाइस आहे. यात एक प्रोसेसर संगणक, एक बॅटरी आणि या दोघांना जोडणारे हूक असे तीन मुख्य भाग आहेत. हे उपकरण शर्टच्या कॉलरजवळ किंवा छातीजवळ कपड्यावर लावता येते. उपकरणाच्या दर्शनी भागावर स्पर्श करताच ते कार्यान्वित होते. त्यानंतर तुम्ही बोटांच्या हालचाली किंवा आवाजी सूचनेद्वारे हे उपकरण हाताळू शकता. एखाद्या ब्लूटूथ इअरबड्सच्या पेटीच्या आकाराच्या या उपकरणाला कोणताही डिस्प्ले वा बटण नाही. मात्र हे उपकरण १३ मेगापिक्सेल क्षमतेची छायाचित्रे टिपू शकते. याशिवाय हे उपकरण आवाजी सूचनेद्वारे अक्षरी संदेशही पाठवू शकते. तसेच आवाजी सूचनेद्वारे कॉल लावू अथवा घेऊही शकते. या उपकरणात एक लेझर प्रोजेक्टर असून, त्याची प्रतिमा तळहातावर घेऊन आलेल्या कॉलची किंवा संदेशाची माहिती आपल्याला पाहता येते. शिवाय हे उपकरण संगीत ऐकण्याचा आनंदही लुटता येतो. या उपकरणात व्हिडिओ रेकॉर्डिंगचीही व्यवस्था आहे. यामध्ये अंतर्गत चॅट जीपीटी ही यंत्रणाही सक्रिय करण्यात आली असून त्याद्वारेही सर्च करणे, परिसराची माहिती मिळवणे आदी क्रिया करता येतात. एआय पिन कार्यान्वित करण्यासाठी त्याला बोटांनी स्पर्श करावा लागतो. त्यानंतर त्याच्या दर्शनी भागातील एलईडी सुरू होतो. त्यामुळे हे उपकरण सुरू आहे की नाही, हे वापरणाऱ्याबरोबरच समोरील व्यक्तीलाही समजते. या उपकरणाचा वापर छुप्या पद्धतीने व्हिडीओ रेकॉर्डिंगसाठी किंवा छायाचित्रणासाठी होऊ नये, अशी त्यामागची मूळ संकल्पना आहे.

## स्मार्टफोनला पर्याय?

एआय पिन या उपकरणामध्ये संपर्क, संवाद साधण्याची तसेच संगीत ऐकण्याची, छायाचित्रणाची, शोध घेण्याची सुविधा आहे. त्यामुळे हे उपकरण स्मार्टफोनच्या अनेक क्रिया करते. मात्र, यामध्ये विविध अ‍ॅप हाताळण्याची सुविधा नाही. शिवाय वेबसाइट पाहणे किंवा चित्रपट पाहण्याची व्यवस्था नाही. अर्थात ही उपकरणाची प्रथम आवृत्ती असून त्यामध्ये येत्या काळात आणखी बदल होण्याची शक्यता आहे. या उपकरणाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे, स्मार्टफोनवरील कोणतीही क्रिया करताना त्याच्या डिस्प्लेवर नजर खिळवावी लागते. एआय पिन वापरताना यातून सुटका होते. या उपकरणासमोर एखादी वस्तू धरताच ती स्कॅन करून त्याचा इंटरनेटवर शोध घेण्याचे कामही हे उपकरण करते. एवढेच नव्हे तर त्या वस्तूची ऑनलाइन किंमत तपासून ऑनलाइन ऑर्डर करण्याची सुविधाही या उपकरणातून मिळते. एआय पिन अमेरिकेत १६ नोव्हेंबरपासून विक्रीस उपलब्ध झाले आहे. याची अमेरिकेतील किंमत ६९९ डॉलर इतकी असून त्यावर दरमहा २४ डॉलर हे शुल्क डेटा नेटवर्कसाठी आकारण्यात येणार आहे. पुढील वर्षीपासून आणखी काही देशांत हे उपकरण उपलब्ध होईल, असे सांगण्यात येत आहे.



## एआय पिनचे निर्माते कोण?

ह्यूमन या कंपनीने एआय पिनची निर्मिती केली असून इम्रान चौधरी आणि बेथनी बाँजोर्नो हे तंत्रज्ञ दाम्पत्य या कंपनीचे संस्थापक आहे. ब्रिटिश-अमेरिकन असलेले इम्रान चौधरी हे १९९५ मध्ये अ‍ॅपल कंपनीत प्रशिक्षणार्थी म्हणून नोकरीला लागले. तिथेच अ‍ॅपलच्या डिझाइन विभागाचे संचालक बनले. त्यांच्याकडे अ‍ॅपलच्या विविध उत्पादनांची रचना ठरवण्याची जबाबदारी होती. मूळ आयफोनच्या इंटरफेसची रचना करण्याचे श्रेय चौधरी यांच्याकडे जाते. आयफोन, आयपॅड, मॅक, अ‍ॅपल टीव्ही या उत्पादनांतील शंभरहून अधिक पेटंट चौधरी यांच्या नावावर आहेत. अ‍ॅपलचे संस्थापक स्टीव्ह जॉब्स यांच्या निधनानंतर चौधरी यांचे नवीन सीईओ टीम कूक यांच्याशी पटेनासे झाले आणि त्यांनी त्यांच्या पत्नी बेथनी यांच्यासह अ‍ॅपलला सोडचिठ्ठी देऊन 'ह्यूमन'ची स्थापना केली. 'एआय पिन' हे ह्यूमनचे पहिलेच उत्पादन आहे.

# लॅपटॉपचा कीबोर्ड घरच्या घरी करा रिपेअर

- सॉफ्ट ब्रश वापरा : कीबोर्ड साफ करण्यासाठी सॉफ्ट ब्रश वापरा. कारण या ब्रशने तुम्हाला कीबोर्डमधील लहान किटाणू आणि घाण साफ करण्यास मदत होईल आणि बटणं खराबही होणार नाहीत.
- कीबोर्ड फ्लिप करा : कीबोर्ड साफ करण्यासाठी एक सोपी टिप म्हणजे किबोर्ड फ्लिप करा तो एकप्रकारे हळुवारपणे झाडा. यामुळे कीबोर्डवर असलेली धूळ निघून जाईल.
- सॅनिटायझर वापरा : अनेक वेळा कीबोर्डवर वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी पसरू शकतात, जसे की वेगवेगळं खाद्य देखील किबोर्डवर असू शकतं. यामुळे कीबोर्डच्या की आणि इंटरफेसवर चिकट काजळी तयार होऊ शकते. ते स्वच्छ करण्यासाठी अल्कोहोलिक सॅनिटायझर वापरा.
- योग्य साधनं वापरून साफ करा : कीबोर्डमधील लहान छिद्रे साफ करण्यासाठी तुम्ही चिमटा, मेणाचा बल्ब यांसारखी छोटी साधने वापरू शकता. तसंच टूथपिक किंवा कॉटन स्वॅब वापरा. कीबोर्ड आणि कीबोर्डमधील गॅपमधून कचरा काढण्यासाठी तुम्ही टूथपिक किंवा कॉटन स्वॅब वापरू शकता.



- हे काही सोपे आणि सोपे मार्ग आहेत ज्याचा वापर करून तुम्ही तुमचा लॅपटॉप कीबोर्ड घरीच स्वच्छ करू शकता. लक्षात घ्या की कीबोर्ड साफ करण्यापूर्वी, आपण तो पूर्णपणे बंद केला पाहिजे आणि थोडं पाणी वापरुन स्वच्छ करताना पाण्याचे थेंब जास्त विखुरू देऊ नका. तुम्ही या टिप्स फॉलो केल्यास, तुमचा कीबोर्ड जास्त काळ टिकेल आणि नवीन सारखा काम करेल.

# सेक्सटॉर्शन म्हणजे नेमके काय?

## पीडित कसे अडकले जातात?

**वर्षागणिक 'सेक्सटॉर्शन'च्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचे दिसते आहे. बहुतांश वेळा या गुन्ह्यातील आरोपी हे कुठल्यातरी दुर्गम खेड्यातील असतात, त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करणे पोलिसांसाठी कठीण ठरते. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये अडकण्यापेक्षा खबरदारी घेतलेली केव्हाही चांगली, असा सल्ला सायबर गुन्हे तज्ज्ञांकडून देण्यात येतो. याच पार्श्वभूमीवर सेक्सटॉर्शन म्हणजे काय?, या प्रकरणात पीडित कसे अडकले जातात आणि हे होऊ नये म्हणून कुठल्या प्रकारची काळजी घ्यावी हा विषय समजून घेणे नक्कीच महत्त्वाचे ठरावे...**



### आमिष दाखवले जाते...

आरोपी तरुण तसेच किशोरवयीन मुलांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी त्यांची प्रशंसा किंवा खुशामत करतात. काही वेळेस रोमँटिक (प्रेम संबंध) नातेसंबंधाचे वचन देखील दिले जाते. ते पीडितांसोबत घनिष्ट मैत्री निर्माण करण्यासाठी खऱ्याखुऱ्या संभाषणांना सुरुवात करतात. काहीवेळा हे गुन्हेगार मुलांना मॉडेलिंग आदींचे आमिषही दाखवतात. ऑनलाइन गेम क्रेडिट्स किंवा कोड; अथवा पैसे, क्रिप्टोकरन्सी आणि भेटकार्डे यांसारखी आमिषे दाखवून त्याच्या बदल्यात त्यांचे फोटो (प्रतिमा) मिळवतात. जेथे शक्य नाही तेथे अशा स्वरूपाच्या गोष्टी मिळविण्याकरिता संगणक हॅक करतात. हे गुन्हेगार सामान्यतः एका प्लॅटफॉर्मवर पीडित व्यक्तीशी प्रथम संपर्क साधतात, नंतर त्यांना दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्लॅटफॉर्मवर संपर्क साधण्यास सांगतात, एनक्रिप्टेड संदेश पाठवतात. ज्यामुळे त्यांच्या गुन्ह्यांचा मागोवा घेणे अधिक कठीण होते.

- गेल्याच आठवड्यात एका ३६ वर्षीय व्यक्तीने 'सेक्सटॉर्शन'मुळे मानसिक तणावाखाली माटुंगा स्थानकाजवळ रेल्वेखाली आत्महत्या केली. ही व्यक्ती मूळची डोंबिवलीची होती. या प्रकरणात एका स्त्रीने फेसबुकच्या माध्यमातून ओळख वाढवून त्या व्यक्तीची चित्रफीत तयार केली आणि त्या चित्रफितीस अश्लील स्वरूप देण्यात आले, असे नंतरच्या पोलीस तपासात निष्पन्न झाले. त्या चित्रफितीचा वापर करूनच मयत व्यक्तीला ब्लॅकमेल करण्यात आले. त्या व्यक्तीकडून दोन लाखांची खंडणी मागण्यात आली. हे प्रकरण इतक्यावरच थांबले नाही, तर एकदा पैसे दिल्यानंतरही मागणी सुरूच राहिली. त्यामुळेच या जाचाला कंटाळून या व्यक्तीने आत्महत्या केल्याचे, त्याने चिठ्ठीत नमूद केले आहे.
- सेक्सटॉर्शन हा एक सायबर गुन्हा- सायबर फसवणूक आहे. आजच्या इंटरनेटच्या जगात आपण सहजच एखाद्या अनोळखी व्यक्तीशी संभाषण 'चॅटिंग'च्या माध्यमातून सुरू करतो, ओळख वाढते, मोबाईल नंबर्सची देवाणघेवाण होते, त्या व्यक्तीसोबत व्हिडीओ कॉल सुरू होतात आणि याचीच परिणती 'प्रेम, आकर्षण, वासना' यांसारख्या भावनांमध्ये होते. अखेरीस त्यातूनच न्यूड- नग्न प्रतिमांची अदलाबदल किंवा व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून या सगळ्याचे प्रदर्शन होते. बऱ्याच वेळा नग्नता नसली तरी केवळ कॉलच्या माध्यमातून रेकॉड झालेल्या प्रतिमांना तसे स्वरूप दिले जाते. एकदा का आरोपीचे काम झाले की, खंडणीसाठी कॉल येतात. तुम्ही ठरलेली खंडणी दिली नाही तर तुमच्या अश्लील, नग्न प्रतिमा, चित्रफिती प्रसारमाध्यमांवर व्हायरल करण्याची धमकी दिली जाते. या प्रकरणांमध्ये केवळ पुरुषच नाही तर महिला पीडितांची संख्याही वाढते आहे.





### आभास हा...

सेक्सटॉर्शन प्रकरणात खोटी अकाऊंट्स तयार केली जातात, फेसबुक किंवा इतर ठिकाहून सामान्य दिसणाऱ्या महिलेचे फोटो डाउनलोड केले जातात. या अकाऊंट्ससाठी त्या सामान्य महिलांचे फोटो डीपी म्हणून वापरले जातात, तसेच त्या अकाऊंट्सना सामान्य दिसणाऱ्या महिलांची नावे ही दिली जातात, जेणेकरून समोरच्या व्यक्तीला ती अकाऊंट्स खरी वाटतील. या प्रकरणात प्रत्यक्ष संभाषण व्हॉट्स अ‍ॅप आणि व्हिडिओ कॉलवर होते, मूलतः बहुतांश वेळेस कधीच खरी स्त्री नसते, या संभाषणात पीडीत समोरचा फ्रंट कॅमेरा वापरत असताना; आरोपी मात्र नेहमी मोबाईलच्या मागच्या बाजूस असलेला रेअर कॅमेरा वापरतो आणि पॉर्न साईटवरून एका स्त्रीचे अर्धवट नग्न शरीर दिसेल याची काळजी घेतो आणि कॉल संपताच टार्गेटला पैशांची मागणी करणारा मेसेज येतो.

### बाहेर पडणे अधिक गुंतागुंतीचे

बहुतांश वेळा पैसे किंवा खंडणी देऊन आपली यातून सुटका होईल असे पीडितांना वाटते. त्यामुळे पैसे देऊन हा प्रकार मिटविण्याचा प्रयत्न केला जातो, आणि गुन्हा नोंदविला जात नाही. परंतु हे सत्र तसेच सुरू राहते, पीडितांना भारतभरातून आसाम, ओडिसा, पश्चिम बंगाल, राजस्थान अशा वेगवेगळ्या ठिकाणांवरून कॉल्स येतात. राजस्थानमधील भरतपूर-अलवर पट्ट्यातील टोळ्या या 'सेक्स्टॉर्शन रॅकेट' चालविण्यात अग्रेसर आहेत, असे पोलीस तपासात लक्षात आले आहे.

### राजस्थान रडारवर

सेक्सटॉर्शन रॅकेट्स मिनी कॉटेज इंडस्ट्रीज (छोटेखानी कुटिरोद्योग) प्रमाणे चालवले जातात. या बहुतांश टोळ्या राजस्थानातून कार्यरत आहे. भरतपूर, अलवर पट्ट्यातील गावागावांमध्ये अर्थार्जनाचा स्त्रोत म्हणून याकडे पाहिले जाते. विशेष म्हणजे हे उद्योग आरोपींच्या घरातूनच चालविले जातात. मोबाईल, लॅपटॉप, सिम कार्ड्स इत्यादी सारख्या कमी साधनांच्या वापरातून या टोळ्या कार्यरत आहेत. स्थानिक पातळीवर त्यांची ओळख 'लाडकीवाला' म्हणून आहे. या बाबत गावात सगळ्यांना माहीत असले तरी, कोणीही तक्रार करत नाही. उलट पोलिसांच्या धाडीत त्यांच्याच समर्थनार्थ गावकरी उभे राहतात. या कामात अल्पवयीन मुलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे.

### गुन्ह्याची मोडस ऑपरेंडी


'सेक्सटॉर्शन'च्या या गुन्ह्यासाठी एक ठरावीक मोडस ऑपरेंडी वापरली जाते. सर्वसाधारणपणे पीडितांबरोबर खोटा संबंध निर्माण करणे, चॅट दरम्यान गुप्तपणे व्हिडिओ आणि संदेश रेकॉर्डिंग करणे, किशोरवयीन मुलांशी संपर्क साधण्यासाठी एखादी ओळख वापरणे असे मार्ग सर्रास वापरले जातात. त्याचप्रमाणे अनेकदा वयाने लहान किंवा विरुद्ध लिंगी असल्याचे आरोपीकडून भासवले जाते. लैंगिक प्रतिमा चोरण्यासाठी समाजमाध्यमांवरील खाती हॅक करणे, पिडितांनी फोटो पाठवण्यास नकार दिल्यास आत्महत्येची धमकी, पीडितांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी सार्वजनिक सोशल मीडिया प्रोफाइलला भेट देणे, ज्यामध्ये पीडितांच्या फ्रेंड लिस्टमध्ये प्रवेश करणे आणि प्रतिष्ठेला हानी पोहोचवणारी इतर वैयक्तिक माहिती शोधणे आदी बाबींचाही या मोडस ऑपरेंडीमध्ये समावेश होतो.

### सेक्सटॉर्शन कसे केले जाते?

आरोपी ज्या व्यक्तीला फसवायचे आहे, त्या व्यक्तीशी संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात. सोशल मीडियावर अनेकदा मैत्रीसाठी विनंती वारंवार केली जाते. मुख्यतः तरुणवयीन त्याचप्रमाणे किशोरवयीन मुले त्यांचे लक्ष्य असतात. असे असले तरी गेल्या दोन वर्षांत असे लक्षात आले आहे की, मध्यमवयीनांची संख्याही तेवढीच वाढते आहे, परंतु या वयोगटातील लोकांकडून लोकलज्जेस्तव त्या गुन्ह्यांची तक्रार करणे टाळले जाते. दाखल गुन्ह्यांच्या आकडेवारीनुसार यामध्ये अल्पवयीन मुलांशी संबंधित गुन्ह्यांचे प्रमाण ७० टक्क्यांहून अधिक आहे, तर आजपर्यंत झालेल्या एकूणच गुन्ह्यांचे स्वरूप पाहता अल्पवयीन मुलांबरोबरीनेच वय वर्षे ४० च्या आसपास असलेल्या मध्यमवयीन पुरुषांचा समावेशही पीडितांमध्ये अधिक आहे. कोण किती खंडणी देऊ शकेल आणि त्यानंतर वाच्यता कोण करणार नाही, याचाही विचार आरोपींनी गुन्हा घडताना केलेला असतो, असे अनेक तपासांमध्ये लक्षात आले आहे.

### काय टाळाल?

घरात किशोरवयीन मुले असतील आणि त्यांना धमक्या आल्या तर त्याविरोधात तक्रार करण्यास शिकवा. ते तणावग्रस्त किंवा लाजिरवाणे असले तरी, त्यांच्याशी ऑनलाइन सुरक्षिततेबद्दल बोला आणि त्यांना संशयास्पद ईमेल किंवा मेसेजेस आले तर काय करायचे, याची कल्पना द्या. शिवाय सायबरतज्ज्ञ सांगतात की, तुमच्या घरातील रेकॉर्डिंग उपकरणांपासून सावध रहा. काही कमी सुरक्षित उपकरणे, जसे की बेबी मॉनिटर्स आणि नॅनी-कॅम यांच्या माध्यमातून लैंगिक शोषण केले जाऊ शकते. गृहीत धरा की, तुमचा वेबकॅम किंवा रेकॉर्डिंग डिव्हाइस तिसऱ्या व्यक्तीकडून सक्रिय केले जाऊ शकते. तुमचा फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक कॅमेरा उपकरणे गोपनीय ठिकाणी सक्रिय राहणार नाहीत याची काळजी घ्या. तुम्ही तुमचा वेबकॅम वापरत नसताना झाकून ठेवा; तुमच्या वेबकॅममध्ये अंगभूत कव्हर नसल्यास, ते झाकण्यासाठी स्टिकर किंवा टेपचा तुकडा वापरा. अशा प्रकरणांत घाबरून जाण्यापेक्षा जवळच्या व्यक्तीला विश्वासात घेऊन सगळं सांगा, त्यामुळे मदत मिळू शकते. भावनाविवश होऊन कुठलाही चुकीचा निर्णय घेऊ नका, असा सल्लाही सायबर पोलीस देतात.



### काय खबरदारी घ्याल?

प्रत्यक्षात परिचयाच्या नसलेल्या कोणाचीही ऑनलाइन फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका, असा सल्ला सायबरतज्ज्ञ नेहमीच देतात. कोणत्याही अनोळखी व्यक्ती बरोबर ईमेल किंवा सोशल मीडिया हँडल्स शेअर करू नका. तुम्ही ओळखत नसलेल्या व्यक्तीने तुमची वैयक्तिक माहिती विचारली तर 'नाही' म्हणा. तुमचा पासवर्ड कधीही कोणाशीही शेअर करू नका. पाळीव प्राण्यांची नावे, जन्मतारीख आदी अंदाज लावण्याइतके सोपे पासवर्ड वापरू नका. तुम्हाला माहीत नसलेल्या लोकांकडून आलेल्या ई-मेलमधील लिंकवर क्लिक करू नका; असे केल्याने हॅकर्स तुमच्या उपकरणाशी जोडला जाऊ शकतो.

## शॉर्ट न्यूज

### हिंदू जनजागृती समितीचा आक्रमक पवित्रा

■ **नगर :** हिंदू जनजागृती समितीने जिल्हाधिकारी कार्यालयात लव्ह जिहादविरोधी कायदा तात्काळ लागू करण्याची मागणी करत आंदोलन केले. या आंदोलनात महिला, तरुण आणि हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी हिंदू मुलींच्या सुरक्षेसाठी सरकारकडे कठोर आणि दंडात्मक कायदा करण्याची मागणी केली. जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले. आंदोलकांनी घोषणाबाजी, पोस्टर्स आणि जनजागृती संदेशांद्वारे आपला आक्रमक पवित्रा दर्शवला.

### रणरागिणींनी केला दारूअड्डा उद्‌ध्वस्त

■ **अकोले :** तालुक्यातील खडकी बु येथे दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाल्याने संतप्त महिलांनी दारू अड्ड्यावर हल्लाबोल केला. विक्रीसाठी आणलेले दारूचे नऊ बॉक्स ताब्यात घेऊन फोडण्यात आले. पोलिसांनी अवैध दारू विकणाऱ्या दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गावातील पुता बांडे आणि त्याचे कुटुंबीय अनेक दिवसांपासून दारू विक्री करत होते, मात्र गावकऱ्यांच्या वारंवार समज देऊनही विक्री सुरूच होती.

### विना नंबरप्लेट ५७ दुचाकींवर कारवाई

■ **राहुरी :** तालुक्यातील वांबोरी पोलीस दूरक्षेत्र हद्दीत पोलिसांनी विना नंबरप्लेट दुचाकी गाड्यांची तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान ५७ बिगर नंबर गाड्यांवर कारवाई करत २८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. दंड वसूल केल्यानंतर या गाड्यांना नंबरप्लेट बसवून मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले.

### चोऱ्या करणारा सराईत आरोपी गजाआड

■ **पाथर्डी :** शहर आणि परिसरात घरफोडी व चोरीच्या घटनांच्या तपासाला गती मिळाली आहे. पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे रंगार गल्ली, पाथर्डी येथील मूळ रहिवासी आणि सध्या अहिल्यानगर येथे वास्तव्यास असलेला सराईत गुन्हेगार बाळू किशोर कुन्हे (वय ७०) याला अटक केली. चौकशीत त्याने पाथर्डी आणि पाथर्डी पोलीस ठाणे हद्दीतल्या १३ हून अधिक चोऱ्यांची कबुली दिली. त्यानुसार पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भिंती बोलक्या झाल्या... पण कलाकार मुका झाला !

**। शिरूरला पेंटिंग व्यवसायाचा रंग उडाला**
**। डिजिटल युगात पेंटरच्या आयुष्याचा बेरंग**

शिरूर : सतीश डोंगरे

एकेकाळी गावागावात, चौकाचौकात हाताने रंगवलेल्या पाट्यांची जादू दिसायची. दुकानाचे नाव, मेन्यू बोर्ड, लग्नाचे स्वागत फलक, भिंतीवरील व्यावसायिक जाहिराती सगळं काही ब्रशच्या ओघवत्या रेषांनी उठून दिसायचं. पण काळ बदलला, तंत्रज्ञानाने झपाट्याने उडी घेतली आणि या बदलाच्या लाटेत हाताने पाट्या लिहिणाऱ्या पेंटरांवर उपसमारीची वेळ येऊ लागली आहे. तंत्रज्ञान प्रगती आणते, पण कधीकधी ते कोणाचं तरी पोट हिरावून घेतं. याचा प्रत्यय सध्या पेंटर कलाकारांच्या बाबतीत येत आहे.




### डिजिटल प्रिंटिंगचा धडाका आणि ब्रशचा बेरंग

गेल्या काही वर्षात फ्लेक्स बोर्ड, डिजिटल प्रिंट आणि एलईडी पाट्यांचे प्रमाण प्रचंड वाढले. एक क्लिक आणि काही मिनिटांत झगमगते बोर्ड तयार. स्वस्त, आकर्षक आणि झटपट मिळणारे हे पर्याय ग्राहकांना अधिक मोहात पाडू लागले आहेत. परिणामी, हाताने पेंटींग करणाऱ्यांचा व्यवसाय अखेरच्या घटका मोजत आहे. शंभरदोनशे रुपयांत तयार होणाऱ्या फ्लेक्स बोर्डांसमोर हाताने होणारी मेहनत, वेळ आणि खर्च याला आज ग्राहक महत्त्व देताना दिसत नाहीत. यामुळे अनेक अनुभवी कलाकारांना कामासाठी अक्षरशः धावपळ करावी लागत आहे.

### शिरूरचे नामवंत पेंटर काळाच्या पडद्याआड !

ऐकेकाळचे शिरूरचे नावाजलेले पेंटर बरला, डी. मोकाशी, नवरंग हे नामवंत पेंटर आता काळाच्या पडद्याआड गेले आहेत. बरला यांची पुढची पिढी डिजिटल व्यवसायात उतरली आहे. डी. मोकाशी बऱ्याच वर्षांपूर्वी शिरूर सोडून त्यांच्या सातारा या मूळ गावी गेले तर पेंटर नवरंग नावाने पेंटींग करणारे दत्ता जामदार यांचे अलिकडेच निधन झाले. कलासागर आर्टस् ही आता डिजीटल मध्ये स्थिरस्थावर झाले आहे. पेंटर दि ठाकूर, पेंटर भोसले, पेंटर मल्लाव आणि पेंटर असिफ असे मोजकेच पेंटर आता अखेरच्या घटका मोजत असलेल्या या व्यवसायाशी दोन हात करत पोटापाण्याची लढाई लढत आहेत.

### ''आमचा रंगच उडाला'' – पेंटरांचा आक्रोश

स्थानिक पेंटर दि ठाकूर यांनी सांगितले, ''दहापंधरा वर्षांपूर्वी महिनाभर कामाचे ओझे असायचे. निवडणुकीच्या काळात तर हातातून ब्रश खाली ठेवायलाही वेळ नव्हता. पण आता डिजिटल लोकांनी बाजी मारली. आमच्या पेंटींगच्या कला आणि कष्टाचा रंगाचा बेरंग झाला आहे.'' अनेकांना काम नसल्याने वेगवेगळ्या क्षेत्रात मजुरी करावी लागत आहे. काहींनी छोट्या डिजिटल मशीन घेऊन स्वतः व्यवसाय सुरू करण्याचा प्रयत्न केला, परंतु खर्च परवडत नसल्याने बरेच जण मागे पडले.

### परंपरेचे जतन की तंत्रज्ञानाचा स्विकार – मोठा प्रश्न

कला टिकवायची तर आधुनिक बाजारपेठेला साजेशी कौशल्ये शिकावी लागतील, असा संदेश तज्ज्ञ देत आहेत. दुसरीकडे डिजिटल युगात हातकलेला स्थान मिळवून देण्यासाठी शासकीय प्रशिक्षण, कला प्रदर्शन, पारंपरिक पाट्यांचा ब्रँण्डिंगमध्ये वापर अशा प्रयत्नांची गरज व्यक्त होत आहे. परंतु सध्या मात्र डिजिटल पाट्यांच्या चकचकीत प्रकाशात पेंटींग व्यवसायाचा ''रंग'' हळूहळू फिका होताना दिसत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

### ऐकेकाळी हाताने रंगविलेले फलक प्रतिष्ठेची ओळख होती !

एकेकाळी निवडणुकीचा प्रचार असो वा दुकानांची नावे, सण–उत्सव असो वा लग्नाचे स्वागत फलक; प्रत्येक ठिकाणी हाताने रंगवलेले फलक हीच प्रतिष्ठेची ओळख होती. मात्र, तंत्रज्ञानाच्या वेगामुळे आणि फ्लेक्स प्रिंटिंगच्या डिजिटल युगात हाताने चित्र साकारणाऱ्या पेंटरच्या आयुष्यातील रंग आता उडाला आहे. संगणकीकृत डिझाईन्सच्या झगमगाटात पारंपरिक पेंटिंग व्यवसाय मोडकळीस आला असून, अनेक ज्येष्ठ पेंटर कलाकारांवर आता उपासमारीची वेळ आली आहे.

### कुंचल्याची जागा माऊसने घेतली !

गेल्या १०–१५ वर्षांत जाहिरात क्षेत्रात आमूलाग्र बदल झाला आहे. पूर्वी दुकानांचे शटर, भिंती आणि पत्र्याच्या पाट्यांवर पेंटर तासन् तास बसून सुबक अक्षरे काढत असत. त्या अक्षरांमध्ये एक जिवंतपणा असायचा. मात्र, आता डिजिटल बॅनर आणि विनाईल प्रिंटिंगचे युग आले आहे. जे काम करण्यासाठी पेंटरला २–३ दिवस लागायचे, तेच काम आता मशीनवर अवघ्या १५ ते २० मिनिटांत आणि तेही निम्म्या दरात होत आहे. त्यामुळे ग्राहकांचा ओढा साहजिकच डिजिटल कामाकडे वाढला आहे.

### कलेपेक्षा वेळेला महत्त्व...

या बदलाचा सर्वात मोठा फटका अशा कलाकारांना बसला आहे, ज्यांचे संपूर्ण कुटुंब या कलेवर अवलंबून होते. याविषयी बोलताना ज्येष्ठ पेंटर रमेश मल्लाव सांगतात, ''पूर्वी दिवाळी, गणपती आणि निवडणुकांच्या काळात आम्हाला जेवायलाही सवड नसायची. रात्रंदिवस काम चालायचे. पण आता काम मिळणेही कठीण झाले आहे. लोक म्हणतात, हाताने लिहिण्यात वेळ जास्त जातो आणि फिनिशिंग डिजिटलसारखी येत नाही. पोटाची खळगी भरण्यासाठी आता पेंटरला हातातला ब्रश सोडून मजुरी करण्याची वेळ आली आहे.''

### पेंटींग व्यवसायाचे वास्तव

नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त व्यावसायिक कामे आता प्रिंटिंग प्रेसकडे वळली आहेत. पूर्वी भिंतींवरच्या जाहिराती हे पेंटरचे हक्काचे उत्पन्न होते. शासकीय योजना, सिमेंटच्या जाहिराती किंवा खतांच्या जाहिराती भिंतींवर रंगवल्या जायच्या. आता त्याची जागाही डिजिटल होर्डिंग्सने घेतली आहे. भिंती रंगवण्याचे काम क्वचितच मिळते आणि मिळाले तरी त्याचे दर १० वर्षांपूर्वीचेच आहेत, मात्र महागाई गगनाला भिडली आहे.


### कलेचा अस्त की स्थित्यंतर?

हाताने केलेले पेंटिंग ही केवळ जाहिरात नसून ती एक कला होती. त्या अक्षरांच्या वळणात पेंटरची शैली असायची. डिजिटल युगात सुबकता आली असली, तरी तो जिवंतपणा हरवला आहे. काळाच्या ओघात हे बदल अपरिहार्य असले, तरी या बदलात शेकडो कलाकारांच्या आयुष्याचा बेरंग झाला आहे, हे विसरून चालणार नाही. शासनाने किंवा कलाप्रेमींनी या लुप्त होत चाललेल्या कलेला आश्रय दिला नाही, तर काही वर्षांत पेंटर ही जमात फक्त इतिहासात जमा होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

## गुनाट गावची आदर्श दत्तजयंती

१२ वर्षांनी पुन्हा दत्तजयंतीचा योग! ही भक्तियोगात्मक बातमी वाचली (पारनेर दर्शन ६ डिसेंबर, शनिवार). ४ डिसेंबर गुरुवार रोजी गुनाट, ता. शिरूर, जि. पुणे येथे संपन्न झालेल्या दत्तजयंतीचा हा वृत्तान्त वाचनीय वाटला. या जयंतीनिमित्ताने गावात कीर्तन सप्ताह, आरती, भजन, श्रीदत्त चरित्राचे पारायण, महाप्रसाद असे या जयंत्युत्सवाचे भक्तीमय स्वरूप होते. ते अनुभवण्यासाठी पंचक्रोशीतील सानथोर भाविकजन गुणाट गावात आले होते. हे असे पवित्र सोहळे आपल्या आध्यात्मिक भारतीय संस्कृतीच्या जिवंत खुणाच होत.



चलो कहीं पे तअल्लुक़ की कोई
शक्ल तो हो।
किसी के दिल में किसी की कमी
ग़नीमत है।।

नाते जोडण्यासाठी काही तरी निमित्तकारण हवेच. कोणाच्या अंत:करणात कशाची कमी असणे आफतच आहे. आपला समाज, त्यातले घट्ट नातेसंबंध टिकण्यासाठी, त्याला मजबुती येण्यासाठी

एकमेकां साह्य करू।
अवघे धरू सुपंथ।।

एकमेकांना साह्य करू. सन्मार्गाने पुढे जाऊ. अशा समाजवृत्तीची गरज असते.

भारतात भक्तिसंप्रदायाची मोठी परंपरा आहे. महाराष्ट्रात तर वैष्णव, शैव, दत्त असे विविध भक्तिसंप्रदाय अस्तित्वात आहेत. भक्ती स्वतः नारदांना सांगते,

उत्पन्ना द्राविडे चाहं
कर्नाटे वृद्धिमागता।
स्थिता किंचिन्महाराष्ट्रे गुर्जरे
जीर्णतां गता।।

मी कर्नाटकात जन्मले. काही काळ महाराष्ट्रात राहिले. (तेथून) गुजरातमध्ये पोहोचल्यावर वृद्धत्वास पोहोचले (अर्थात् पूर्णत्वास पोहोचले). भक्तीचा उगम दक्षिणेतल्या अलवार संतांपर्यंत जाऊन पोहोचतो. नंतर ती उत्तर भारतात परिणत अवस्थेस पोहोचली.भक्तीचे स्थान बुद्धीत नाही; तर भक्तांच्या भावनेत किंवा हृदयात असते. यात चिंतन कमी. भावना प्रबळ असतात.

भारतीय संस्कृतीच्या एका विशिष्ट अंगाचे दर्शन गुनाट गावात प्रकर्षाने जाणवले. इतर ठिकाणीही त्याचा आदर्श घेतला जावा ही अपेक्षा.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

**काव्यरंग**

### '' पण ध्यान कोण देतो !''

कष्टास मोल नाही
मालास भाव नाही ,
करपून रान गेले...
आस–यास गाव नाही
आडत्यांच्या आडवणुकीने
हैराण जीव होतो...
पण ध्यान कोण देतो !
मातीत जन्म गेला
जन्माची माती झाली ,
नात्यांचा निवारा विरता...
अब्रूला खोंगळ पडली
इज्जतीचा पंचनामा होता...



लटकुनी जीवही जातो ,
पण ध्यान कोण देतो !
नेते आले नटून सारे
कर्जमाफ करतो म्हणाले
वांझोटे ते बोल तयांचे...
वा–यावरती विरून गेले
गाभाडलेला सातबारा...
नुसताच धूळ खातो ,
पण ध्यान कोण देतो !

**साहेबराव ठाणगे**
९८२००९३८६७

(पान १ वरून)

### थंडीची पुन्हा चाहूल

पुण्यात १२.९, लोहगाव १६.९, अहमदनगर १२.५, सोलापूर १७.९ अंश किमान तापमान होते. मराठवाड्यात धाराशीव १२.४, छत्रपती संभाजीनगर १२.९, परभणी ११.५ आणि बीड येथे १२ अंश नोंदले गेले. या भागांमध्ये सरासरीपेक्षा थोडी तापमानघट दिसून आली.

राज्यात पुढील काही दिवसांत किमान तापमानात आणखी घसरण होण्याची चिन्हे हवामान विभागाने दाखवून दिली असून मुंबईसह अनेक भागांत सकाळसंध्याकाळ अधिक गारठा जाणवण्याची शक्यता आहे.

(पान १ वरून)

### महापालिका निवडणुकीत 'ठाकरे ब्रँड' चा फुगा फुटेल !

असलेल्या गावात जाऊन प्रचार केला. कारण कार्यकर्त्यांच्या संघर्षाचा मान आम्हाला ठेवायचा होता,'' असे ते म्हणाले.

दरम्यान, येत्या हिवाळी अधिवेशनाची माहिती देताना फडणवीस म्हणाले की, एकूण १८ विधेयके सादर होणार असून, चर्चे नंतर ती मंजूर केली जातील. ''आचारसंहितेमुळे वेळ कमी असला तरी सरकार अधिवेशनातून पळणारे नाही. शनिवारी–रविवारीही कामकाज सुरू ठेवणार आहोत,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

राजकीय वातावरण रंगत असतानाच, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यातील बेबनावाविषयी प्रश्न उपस्थित होताच शिंदेंनी नेहमीप्रमाणे उपहासाचा पेरणीसुद्धा केली. ''रोज आम्ही काय बोलतो त्याचे रेकॉर्डिंग पाठवू का? किंवा रोज फोटो काढून इन्स्टाग्रामवर टाकू? नसेल तर 'हास्यजत्रेत' दोघेही हजर राहू,'' असा खोचक प्रतिसाद देत त्यांनी बेबनावाच्या चर्चेला फुलांवरच तोड दिली.

विरोधकांवर वार करताना शिंदे म्हणाले, ''विरोधी पक्षनेता हवा म्हणतात, पण जनतेनेच त्यांना झिडकारले. तेवढेही संख्याबळ मिळालेले नाही, हे वास्तव त्यांनी स्वीकारावे. आम्ही त्यांचा सन्मान करतो; पण पुढच्या वेळी निदान विरोधी पक्षनेते पद मिळेल या दिशेने प्रयत्न करावेत,'' असा उपरोधिक टोला त्यांनी लगावला.

राज्यातील स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आणि विरोधकांतील शाब्दिक चकमकींनी तापमान चढले आहे. सत्ता आणि विरोधक यांच्या आक्रमण–प्रतिआक्रमणाने पुढील टप्प्यातील राजकारण अधिकच धारदार होण्याचे संकेत दिले आहेत.

### कुकडी डावा कालवा आवर्तन सोडा

कांदा हा पारनेर तालुक्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. रोपे लावण्यापासून ते वाढीपर्यंत पिकाला सातत्याने पाण्याची आवश्यकता असते. आवर्तन उशिरा झाल्यास उत्पादनावर परिणाम, खर्चात वाढ आणि मेहनतीचे नुकसान होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आवर्तन लवकर सुरू करण्याची त्यांची अपेक्षा योग्य असून, त्यासाठी प्रशासनाकडून तत्पर निर्णय होणे गरजेचे आहे.

**पाणीप्रश्नास प्राधान्य**

''शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडवणे हे माझे प्राधान्य आहे. कालवा आवर्तनासाठी शासन व प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. आवर्तन वेळेत सुरू झाल्यास कांदा लागवड सुरक्षित राहील, उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांचा आत्मविश्वास उंचावेल. तालुक्याच्या अर्थकारणात कांद्याचे महत्त्व लक्षात घेता प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा.''
आ. काशिनाथ दाते, विधानसभा सदस्य

### धनंजय मुंडेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

वाहिल्यानंतर आजचे कामकाज स्थगित झाले. त्यानंतर आमदार धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीवेळी राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला उपस्थित होत्या. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवारही हजर होते. या चौघांत यावेळी काय चर्चा झाली? हे समजू शकले नाही. पण सूत्रांनी त्यांच्यात संतोष देशमुख हत्या प्रकरण व तत्सम मुद्यांवर चर्चा झाल्याचा दावा केला आहे.

काय म्हणाले धनंजय मुंडे?

पत्रकारांनी या भेटीविषयी धनंजय मुंडे यांना छेडले असता त्यांनी आपण आपल्या मतदारसंघातील कामांविषयी मुख्यमंत्र्यांना भेटल्याचे सांगितले. मी १ लाख ४० हजार मतांनी निवडून आलो आहे. माझी काही जबाबदारी आहे की नाही? बीडच्या संदर्भातील काही काम होते. त्यासाठी मी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आहे. आता आशा करतो की, कामे लवकर होतील, असे ते म्हणाले. यावेळी त्यांना मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपांविषयी विचारले असता त्यांनी त्यावर बोलण्यास नकार दिला. मी मनोज जरांगे यांच्या आरोपांवर बोलणार नाही. या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. मागील एका वर्षापासून मला टार्गेट केले जात आहे. का करण्यात येत आहे? याचा विचार पत्रकारांनी करायला हवा, असे ते म्हणाले.

धनंजय मुंडेंनी माझी सुपारी दिली – जरांगे

दुसरीकडे, मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांनी आपल्या हत्येसाठी अडीच कोटींची सुपारी दिल्याचा आरोप केला आहे. धनंजय मुंडे यांनी माझा घातपात करण्याची सुपारी दिली आहे. पोलिसांच्या ताब्यातील ३ आरोपींनी त्यांचे नाव घेतले आहे. मुंडेंना माझ्या अंगावर गाडी घालायची आहे. पण अद्याप जालना पोलिस व गृह मंत्रालयाने त्यांना अटक केली नाही. मी पोलिस बंदोबस्त नाकारला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांना सांभाळत आहेत. त्यांनी त्या क्रूर माणसाला सांभाळू नये. फडणवीस पूर्वीसारखे वागले तर गरिबांना न्याय मिळेल. मी नार्को टेस्टसाठी तयार आहे. माझी व धनंजय मुंडेंची नार्को टेस्ट करा, असे ते म्हणालेत.

### गीताताई हिंगे यांचे अपघातात निधन

सुरू आहेत. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील राजकारणात गीता हिंगे या एक परखड, जिद्दी आणि कार्यकर्त्यांशी सतत संपर्कात राहणाऱ्या नेत्या म्हणून ओळखल्या जात होत्या. मूळच्या भाजपच्या सक्रिय पदाधिकारी असलेल्या हिंगे यांनी जिल्हाध्यक्ष, जिल्हा महामंत्री यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाचे तिकीट नाकारल्याने त्यांनी भाजपला रामराम ठोकला.

२६ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला. पक्षप्रवेशानंतर लगेचच त्यांना महिला प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली होती. गीता हिंगे यांच्या प्रवेशामुळे पक्षाला नवे बळ मिळेल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला होता.

राजकारणाबरोबरच त्या सामाजिक क्षेत्रातही तितक्याच सक्रिय होत्या. 'आधार विश्व फाउंडेशन'च्या अध्यक्षा म्हणून त्यांनी अनेक उपक्रम राबवले. करोना काळात गरजूंपर्यंत अन्नधान्य, औषधे आणि आवश्यक साहित्य पोहोचवण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला होता. त्यांच्या या योगदानाची जिल्ह्यात सर्वत्र प्रशंसा झाली होती.

गीताताई हिंगे यांच्या निधनाने गडचिरोली जिल्ह्याने एक जिद्दी, संवेदनशील आणि जनसंपर्कात कुशल नेतृत्व गमावलं आहे. त्यांच्या अकस्मात जाण्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात शोककळा पसरली असून सर्वपक्षीय नेत्यांनी दुःख व्यक्त केले आहे.

### शुभमन गिलचे पुनरागमन

एकदिवसीय संघातील टी–२० खेळाडू देखील विशाखापट्टणमहून चार्टर्ड फ्लाइटने भुवनेश्वरला रविवारी सकाळी पोहोचले होते.

दरम्यान, स्थानिक वृत्तांनुसार हार्दिक पंड्या सर्वप्रथम भुवनेश्वरला पोहोचलेल्या खेळाडूंमध्ये होता. काही खेळाडूंनी रविवारी संध्याकाळीच कटकच्या बाराबती स्टेडियममध्ये सराव सत्र गाठले.पहिल्या टी–२० सामन्यापूर्वी संघात शुभमन गिलच्या पुनरागमनामुळे टीम इंडियाचा आत्मविश्वास अधिक वाढला आहे. मालिकेची सुरुवात दमदार करण्यासाठी भारतीय संघ सज्ज असून उद्याचा सामना रंगतदार ठरण्याची चिन्हे स्पष्ट आहेत.

# परिवर्तनासाठी 'भक्त' नव्हे, जिद्दी कार्यकर्त्यांची गरज

## डॉ. रफिक सय्यद यांचे प्रतिपादन | महापरिनिर्वाण दिनानिमित्त पारनेरमध्ये अभिवादन सभा



**पारनेर : प्रतिनिधी**

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पारनेर शहरात सामाजिक जागर आणि विचारप्रबोधनाचे वातावरण निर्माण झाले. युनिटी ऑफ मूलनिवासी समाज व सावित्रीफातिमा सदभावना मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिवादन सभेत सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला भक्तांपेक्षा निष्ठावान कार्यकर्त्यांची अधिक गरज असल्याचे स्पष्ट मत सावित्रीफातिमा सदभावना मंचचे कार्याध्यक्ष डॉ. रफिक सय्यद यांनी व्यक्त केले.**

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य रेवण साळवे यांच्या मंगलमय बौद्ध वंदनेने झाली. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महामानवाला अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविकातून बाळासाहेब पातारे यांनी डॉ. आंबेडकरांचे बहुआयामी कार्य, राष्ट्र उभारणीतील त्यांचे योगदान आणि आजच्या काळातील त्यांच्या विचारांची आवश्यकता स्पष्ट केली. तसेच रफिक शेख, मारुती शेरकर, राजेंद्र करंदीकर यांनीही डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वेध घेत प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले.

या अभिवादन सभेला सामाजिक कार्यकर्ते आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात मारुती शेरकर , सुरेश रोकडे, अविनाश देशमुख, भाऊसाहेब औटी, संतोष खोडदे, शाहूराव औटी, हमजेखा मोमिन, रफिक शेख, बन्सीभाऊ घंगाळे, मधुकर पठारे, गौतम साळवे, संपत नगरे, मधुकर नगरे, सचिन नगरे, अंबादास कुटे, प्रदीप नगरे, अमित जाधव, किरण सोनवणे, संपत पवार, बाळासाहेब कांबळे आदी मान्यवरांचा सहभाग होता.

### ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा''

आपल्या प्रभावी मनोगतात बोलताना डॉ. सय्यद म्हणाले, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार केवळ घोषणाबाजीसाठी नाहीत. त्यांच्या नावाचा जयजयकार करणारे 'भक्त' नव्हे, तर त्यांच्या ध्येयधोरणांवर चालणारे आणि सामाजिक विषमतेविरुद्ध संघर्ष करणारे खरे कार्यकर्ते आजची गरज आहेत.'' शिक्षण, संघटन आणि संघर्ष हेच परिवर्तनाचे तीन खांब असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. शिक्षणाने विचार जागतो, संघटनेतून शक्ती निर्माण होते आणि संघर्षामुळे अन्यायाला आव्हान दिले जाते, असे त्यांनी स्पष्ट केले.

### संविधान मूल्यांची जपणूक काळाची गरज

या अभिवादन सभेच्या अध्यक्षस्थानी युनिटी ऑफ मूलनिवासी समाज चे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र करंदीकर होते. त्यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील हक्क आणि कर्तव्यांचे भान समाजात रुजविण्याची आवश्यकता यावर सविस्तर भाष्य केले.''संविधानाची जपणूक ही केवळ कायदेपंडितांची जबाबदारी नसून प्रत्येक सजग नागरिकाचे कर्तव्य आहे,'' असे ते म्हणाले.

### समतान्यायबंधुतेच्या मूल्यांची सामूहिक प्रतिज्ञा

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर समता, न्याय आणि बंधुतेसाठी दिलेला लढा चिरकाल स्मरणात राहावा, या उद्देशाने आयोजित या अभिवादन सभेने पारनेरमध्ये सामाजिक सलोखा आणि विचारजागरणाचे सकारात्मक वातावरण निर्माण केले. उपस्थितांनी संविधान मूल्यांचे पालन, सामाजिक एकोपा वाढवणे आणि आंबेडकरी विचारांची निष्ठापूर्वक अंमलबजावणी करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

# तालुक्यातील प्रतिभेला नवे व्यासपीठ!

## राळेगणसिद्धीमध्ये ५३ वे गणितविज्ञान प्रदर्शन

**राळेगणसिद्धी : प्रतिनिधी**

स्वच्छ, अनुशासित आणि विकासाचे आदर्श केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राळेगणसिद्धी येथे यंदाचे ५३ वे तालुकास्तरीय गणितविज्ञान प्रदर्शन भव्य पैलू घेऊन आयोजित करण्यात येत आहे. हे प्रदर्शन ९ ते ११ डिसेंबर या कालावधीत साजरे होणार असून श्री संत निळोबाराय विद्यालय या ठिकाणी विज्ञानाचा उत्सव रंगणार असल्याची माहिती शिक्षणविस्तार अधिकारी विनेश लाळगे यांनी दिली.




### चारशेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

तालुक्यातील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा सहभाग निश्चित असून, ४०० हून अधिक विद्यार्थी या विज्ञान महोत्सवात आपली प्रतिभा सादर करणार आहेत. प्रदर्शनात विज्ञान व गणित उपकरणांचे प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा, जादूचे प्रयोगअशा बहुविध उपक्रमांचा समावेश आहे. या प्रदर्शनासाठी अधिकाधिक शाळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी कांतीलाल ढवळे, संघटना अध्यक्ष सोपान गवते, गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे, संघटना सचिव दीपक फापाळे व धनंजय घोलप यांनी केले.

### ११ डिसेंबरला समारोप

या तीन दिवसीय विज्ञानमेळाव्याचा समारोप ११ डिसेंबर रोजी होणार असून, आमदार काशीनाथ दाते व शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती प्राचार्य घाणे यांनी दिली. राळेगणसिद्धीच्या प्रेरणादायी वातावरणात विज्ञान-गणिताची नवचैतन्य फुलविणारे हे प्रदर्शन उत्सुकता वाढवणारे ठरणार आहे.

### अण्णा हजारे यांच्या हस्ते उद्घाटन

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अण्णासाहेब हजारे यांच्या अध्यक्षतेखाली या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून, खासदार नीलेश लंके प्रमुख उपस्थिती म्हणून लाभणार आहेत. तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, संस्थाध्यक्ष सदाशिव मापारी, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपतराव पोटे आदी मान्यवर या सोहळ्यास उपस्थित राहणार असल्याची माहिती प्राचार्य सोपानराव घाणे यांनी दिली.

---

# निकृष्ट कामामुळे नागरिक संतप्त

## हंगा-मुंगशी मार्गाची सखोल चौकशी करावी

**सुपा : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुंगशी गावाजवळील हंगामुंगशी रस्त्याचे काम पूर्ण होण्याआधीच रस्त्यावर मोठे खड्डे पडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. उघड्या खड्ड्यांमध्ये केवळ डांबराविना खडी टाकून काम सुरू असून कामाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी ठेकेदारासह सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित अभियंत्याची चौकशी करून कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.



### ७५ लाखांची निविदा

अनेक वर्षांपासून खराब अवस्थेत असलेल्या या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी काही महिन्यांपूर्वी तब्बल ७५ लक्ष रुपयांची निविदा काढण्यात आली. काम त्वरित सुरु झाल्यानंतर मुंगशी, दळवी वस्ती, म्हसणे परिसरातील नागरिकांमध्ये चांगल्या रस्त्याची अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र रस्त्याचे रूपांतर सुधारण्याऐवजी तो अधिकच बिकट स्थितीत जात असल्याचे वास्तव नागरिकांसमोर आले आहे.

### काम सुरू असतानाच रस्ता खचला

काम पूर्णत्वास जाण्याआधीच रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडू लागले. काही ठिकाणी फक्त बारीक खडी टाकून काम आटोपल्याचे दिसत आहे, तर काही भागांमध्ये मोठ्या खड्यांचे थर वर आलेले स्पष्टपणे दिसतात.निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर व योग्य देखरेखीचा अभाव यामुळे रस्ता उखडत असल्याचा ठपका नागरिकांनी ठेवला आहे.

### तीव्र आंदोलनाचा इशारा

कामाची तातडीने चौकशी करून ठेकेदाराविरुद्ध कारवाई करावी, सार्वजनिक बांधकाम विभागातील 'संबंधित' अभियंत्यालाही जबाबदार धरावे, अशी ग्रामस्थांची एकमुखी मागणी आहे.अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मुंगशी गावातील नागरिकांनी दिला आहे.''रस्ते कामाची सखोल चौकशी करावी. कामाचा दर्जा तत्काळ तपासावा. संबंधितांवर कारवाई न केल्यास आंदोलन करण्यात येईल.'' असा सामाजिक कार्यकर्ते प्रविण करपे यांनी दिला आहे.

# ''शिक्षकधर्माची अखेरची ज्योत मालवली''

## | माजी मुख्याध्यापक अशोक गवळी यांचे निधन | समाजातील एक आदर्श व्यक्तिमत्त्व हरपले

**बाबुर्डी : प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यातील बाबुर्डी गावाने एक आदर्श, कर्तृत्ववान आणि कर्मयोगी व्यक्तिमत्त्व गमावले आहे. पुणेवाडी येथील भैरवनाथ विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक सखाराम गवळी (वय ६२) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. गावच्या शैक्षणिक उभारणीत आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देण्यात त्यांनी बजावलेली भूमिका अमूल्य मानली जाते.



### तीन दशकांची प्रेरणादायी शैक्षणिक सेवा

गवळी सरांनी सन १९९२ पासून २०२४ पर्यंत जवळपास तीन दशकांहून अधिक काळ भैरवनाथ विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून कार्य केले. त्यांच्या कार्यकाळात संस्थेची शैक्षणिक उंची वाढली, शिस्तीचा आदर्श निर्माण झाला आणि ग्रामीण भागात शिक्षणाबाबत जनजागृतीसाठी त्यांनी अथक परिश्रम केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज शिक्षक, डॉक्टर, वकील, अभियंते तसेच प्रशासनात उच्च पदांवर कार्यरत आहेत. ''गवळी सर नसते तर आम्ही घडणारच नव्हतो'' असे विद्यार्थी आजही कृतज्ञतेने सांगतात.

### कुटुंबीयांचा आधारस्तंभ गवळी सर

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. शांत, संयमी आणि अभ्यासू स्वभावामुळे ते गावात सर्वांचे लाडके होते. मानवी मूल्यांवर आधारित शिक्षण हीच खरी समाजसेवा, अशी त्यांची ठाम धारणा होती.

### अमरधाममध्ये भावपूर्ण निरोप

बाबुर्डी येथील अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना वातावरण दुःखद व स्तब्ध झाले होते.गवळी सरांची शैक्षणिक परंपरा आणि आदर्श कार्यपद्धती हेच त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अनमोल ठेवा ठरतील.

# करिअरच्या वाटा उजळल्या!

## पारनेर पब्लिक स्कूलमध्ये मार्गदर्शन कार्यशाळा



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे दहावीबारावीनंतर कोणत्या क्षेत्रात पुढे जावे, कोणत्या शाखेत कोणती संधी उपलब्ध आहे, याबाबत विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य कैलास वाघमारे आणि मानसशास्त्र तज्ञ विलास दिघे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.**

कार्यशाळेला संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, प्राचार्य गितारामजी म्हस्के, मान्यवर मार्गदर्शक, शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### 'योग्य वाटाड्या' आवश्यक

मार्गदर्शन करताना कैलास वाघमारे म्हणाले,''जीवनातील करिअरची दिशा ठरवताना योग्य मार्गदर्शक लाभला, तर ध्येयापर्यंत पोहोचणे सोपे होते. शालेय जीवनात ज्ञानाची भूक कायम ठेवावी, हार मानू नये. दहावीनंतर कला, विज्ञान किंवा वाणिज्य कोणतीही शाखा निवडताना स्वतःची आवड आणि भविष्यातील करिअर यांचा नीट विचार करणे अतिशय महत्त्वाचे आहे.''त्यांनी पुढे विविध शाखांत उपलब्ध करिअरच्या संधी, आवश्यक कौशल्ये, बारावीनंतर देण्यायोग्य स्पर्धा परीक्षा आणि त्यासाठीची संकेतस्थळे यांची माहितीही विद्यार्थ्यांना दिली.

### ''योग्य मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी यशस्वी ठरतो''

प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना प्रेरक संदेश देताना सांगितले,''विद्यार्थ्यांनी आयुष्याचा 'राजमार्ग' निवडायचा असेल तर त्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे ही कार्यशाळा आयोजित केली असून, यामुळे विद्यार्थ्यांना बारावीनंतरच्या पुढील प्रवासाची स्पष्ट दिशा मिळेल.''

---

# भांडगाव शाळेत महापरिनिर्वाण दिन

## डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा गौरव




**भांडगाव : प्रतिनिधी**

**भांडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध उपक्रमांच्या माध्यमातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात संगीता जाधव यांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणांमधून आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

### आंबेडकरी विचारांची ओळख

यावेळी उपस्थितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनपट अंगणवाडी सेविका सौ. संगीता जाधव यांनी सविस्तरपणे मांडला.''संविधानाचे जनक म्हणून डॉ. आंबेडकरांचे कार्य देशासाठी अत्यंत मोलाचे असून त्यांच्या विचारांनी समाजप्रबोधनास नवी दिशा दिली,'' असेही त्या म्हणाल्या.

सभेचे सूत्रसंचालन बाळासाहेब सालके यांनी केले. कार्यक्रमास रोहिदास पवार, सुनिता कुटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर खरमाळे, उपाध्यक्षा सविता भुजबळ, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गणेश खरमाळे, उपाध्यक्ष गणेश शेलार, दत्ता भुजबळ, दिलीप जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक अप्पासाहेब नरवडे यांनी सर्व उपस्थितांचे मन:पूर्वक आभार मानत, ''डॉ. आंबेडकरांचे विचार विद्यार्थ्यांनी आचरणात आणणे हीच खरी श्रद्धांजली आहे,'' असे सांगितले.

# निस्वार्थ भावनेनेच सामाजिक कार्याची दिशा घडते

## अण्णासाहेब हजारे यांचे मार्गदर्शन | ग्राहक पंचायतचा अभ्यास वर्ग संपन्न

**राळेगणसिद्धी : प्रतिनिधी**

**राळेगणसिद्धी येथे अखिल भारतीय ग्राहक पंचायत (मध्य महाराष्ट्र प्रांत) आयोजित जिल्हास्तरीय एकदिवसीय अभ्यास वर्ग मोठ्या उत्साहात पार पडला. सामाजिक कार्यकर्त्यांनी संघटनांमध्ये काम करताना निस्वार्थ भावना, नैतिक मूल्यांची जपणूक आणि निष्कलंक आचार ठेवणे हीच खरी सामाजिक सेवा असल्याचा मोलाचा सल्ला पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे यांनी दिला.**

या अभ्यास वर्गास प्रमुख पाहुणे म्हणून राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे उपस्थित होते. तसेच मध्य महाराष्ट्र प्रांताध्यक्ष बाळासाहेब औटी, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य धनंजय गायकवाड, प्रांत संघटक संदीप जंगम, प्रांत कोषाध्यक्ष विलास जगदाळे, प्रांत सदस्य अतुल कुऱ्हाडे, पुणे जिल्हाध्यक्ष ॲड. तुषार झेंडे, जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी, महिला जिल्हाध्यक्षा अमिता कोहली, जिल्हा सचिव दिनेश थोरात, उपाध्यक्ष सुरेश राहणे व अशोक शेवाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

अभ्यास वर्गामुळे कार्यकर्त्यांना सामाजिक कार्याची दिशा, नैतिक मूल्यांचे महत्त्व आणि संघटनात्मक जबाबदाऱ्या अधिक स्पष्टपणे समजल्या, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अमिता कोहली यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा सचिव दिनेश थोरात यांनी मानले.



### माहितीच्या अधिकाराच्या यशाचा अनुभव

अण्णासाहेबांनी आपल्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की, त्यांच्या निष्कलंक व पारदर्शक कार्यपद्धतीमुळेच माहितीचा अधिकार प्रभावीपणे राबविणे शक्य झाले. ''त्यातून देशासाठी दहा महत्त्वाचे कायदे तयार करता आले. हेच खरे सामाजिक कार्याचे यश आहे,'' असे ते म्हणाले.

### ''शुद्ध विचारशुद्ध आचार हेच खरे बळ''

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केला आणि दीपप्रज्वलन करून अभ्यास वर्गाची सांगता केली. सामाजिक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अण्णासाहेब म्हणाले,''सामाजिक क्षेत्रात काम करताना मान-अपमान हा प्रवासाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने अपमान सहन करण्याची क्षमता आणि सत्यावर ठाम राहण्याची जिद्द बाळगली पाहिजे.'' त्यांनी स्पष्ट केले की, भाषण देणे हा दोष नव्हे; परंतु भाषण देणाऱ्याचे जीवन निष्कलंक, विचार शुद्ध आणि वर्तन पारदर्शक असणे अत्यंत आवश्यक आहे.

### निस्वार्थ भावना म्हणजे विकासाची पायाभरणी

ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, संघटनेतील प्रत्येक कार्यकर्त्याने स्वार्थ बाजूला ठेवून निस्वार्थ भावनेने कार्य केल्यास गाव, तालुका, जिल्हा आणि संपूर्ण देशाचा विकास साधता येतो.''नैतिक मूल्ये जोपासा, आचार-विचार शुद्ध ठेवा आणि समाजहितासाठी निष्कलंक जीवन जगण्याचा प्रयत्न करा,'' असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com